लोकमत

# शिवाजी विद्यापीठात गुरुवारी विशेष व्याख्यानाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पुण्याच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट यांच्या संयुक्त सहकार्यातून शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात विशेष व्याख्यान होणार आहे. गुरुवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ ते ५:३० या वेळेत 'डिजिटल युगातील लोकांद्वारे स्पर्धात्मक फायदा' या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानात भारत फोर्जचे एच. आर. आय. आर.चे संचालक डॉ. संतोष भावे मार्गदर्शन करणार आहे.

मानव संसाधनाशी (एच. आर.) संबंधित व्याख्यानाचा लाभ संबंधितांनी घ्यावा, असे आवाहन प्र-संचालक डॉ. नितीन माळी यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षेला २२१४ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला सोमवारी २२१४ विद्यार्थी उपस्थित होते.

उन्हाळी सत्रातील परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या.

पुण्यनगरी

# सीमा भागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षणाची संधी : डॉ. कुबल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दूरशिक्षणाच्या माध्यमातून सीमा भागातील विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत उच्च शिक्षणाची सुवर्णसंधी मिळाली, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगळे होते.

डॉ. कुबल म्हणाले, शिवाजी विद्यापीठ व मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती नेहमीच सीमा भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध असेल, तसेच दूरशिक्षण अंतर्गत दुहेरी पदवीचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.

बेळगाव महानगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष मालोजी अष्टेकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची सुवर्णसंधी आपल्या दारी आली आहे, त्याचा लाभ सीमा भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. यावेळी डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, डॉ. मुफीद मुजावर व डॉ. सुशांत माने यांनी विविध अभ्यासक्रमांबद्दल व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासंबंधी मार्गदर्शन केले.

यावेळी खानापूर मतदारसंघाचे माजी आमदार दिगंबर पाटील, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य एम. जी. पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन करून शिवराज पाटील यांनी आभार मानले.

पुण्यनगरी.

# शिवाजी विद्यापीठात विशेष सत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** 'डिजिटल युगातील लोकांद्वारे स्पर्धात्मक फायदा' या विषयावर शिवाजी विद्यापीठात विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे सत्र गुरुवार, दि. १७ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात सायंकाळी ४ ते ५.३० या वेळेत होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संतोष भावे उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट, पुणे यांच्या संयुक्त सहकार्यातून हे सत्र आयोजित केले आहे, अशी माहिती डॉ. नितीन माळी यांनी दिली आहे.

15 AUG 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमा भागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षणची संधी

## शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

दूरशिक्षणाच्या माध्यमातून सीमा भागातील विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत उच्चशिक्षणाची सुवर्णसंधी असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी आज येथे केले.



**शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बेळगाव येथील आयोजित दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिरात बोलताना उपकुलसचिव डॉ. संजय कुबल. सोबत मालोजी अष्टेकर, प्रकाश मरगळे, एम. जी. पाटील, माजी आमदार दिगंबर पाटील, आदी.**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने बेळगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांकरिता प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगळे होते. खानापूर मतदारसंघाचे माजी आमदार दिगंबर पाटील, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य एम. जी. पाटील, विद्यार्थ्यांसह पालक उपस्थित होते.

डॉ. संजय कुबल म्हणाले, शिवाजी विद्यापीठ व मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती नेहमीच सीमा भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध असेल. तसेच दूरशिक्षण अंतर्गत दुहेरी पदवीचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. मालोजी अष्टेकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्गत विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची सुवर्णसंधी आपल्या दारी आली आहे. त्याचा लाभ सीमा भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, डॉ. मुफीद मुजावर व डॉ. सुशांत माने यांनी बी.ए., बी.कॉम., एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी. (गणित) विविध अभ्यासक्रमाबद्दल व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासंबधी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी व पालकांनी विचारलेल्या प्रश्नाचे निरसन केले. यावेळी प्रास्ताविक व स्वागत डॉ. के. बी. पाटील यांनी केले. शिवराज पाटील यांनी आभार मानले.